# राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

क्रमांक-रानिआ/मनपा-२०१७/प्र.क्र. २९/का.५,
नवीन प्रशासन भवन, हुतात्मा राजगुरु चौक,
मादाम कामा रोड, मुंबई ४०० ०३२
दिनांक: २९/०३/२०१७

प्रति,

सर्व महानगरपालिका आयुक्त
सर्व जिल्हाधिकारी (मुंबई शहर व मुंबई उपनगर वगळून)

विषय :- स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका.
मतदान केंद्राच्या ठिकाणी जमा झालेला कचरा उचलण्याबाबत...

महोदय/महोदया,

राज्य निवडणूक आयोगाच्या असे निदर्शनास आले आहे की, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांकरिता मतदान केंद्र म्हणून विविध शैक्षणिक संस्था, इ. ताब्यात घेण्यात येतात. अशा वास्तूंच्या ठिकाणी निवडणुकीसाठी मतदानाच्या कालावधीत बराच कचरा जमा होतो. मात्र सदर कचऱ्याची विल्हेवाट न लावता मतदान केंद्राचा ताबा सोडण्यात येतो.

मतदान केंद्राच्या ठिकाणी जमा झालेल्या कचऱ्याची योग्य ती विल्हेवाट लावून त्यानंतरच त्या वास्तूचा ताबा संबंधित संस्थेला / कार्यालयाला परत देण्याच्या दृष्टीने संबंधित महानगरपालिका / जिल्हाधिकारी यांनी पुढील कार्यवाही करावी.

१. मतदान केंद्राच्या ठिकाणी जमा होणारा कचरा गोळा करण्याकरिता त्या संस्थेकडे योग्य त्या प्रमाणात डस्टबीनची सुविधा नसल्यास योग्य त्या प्रमाणात डस्टबीन अथवा डस्ट बॅग यांचा पुरवठा करण्यात यावा.

२. प्रत्येक मतदान केंद्राच्या खोलीमधील कचरा त्या केंद्रावरील शिपायामार्फत डस्टबीन / डस्ट बॅगमध्ये टाकणे आवश्यक राहील.

३. मतदान केंद्राच्या इमारतीमधील स्वच्छता करण्याकरिता योग्य त्या प्रमाणामध्ये स्वच्छता कामगारांच्या सेवा उपलब्ध कराव्यात.

४. मतदान केंद्राचा ताबा सोडण्यापूर्वी सर्व कचरा उचलून त्याची विल्हेवाट लावणे आवश्यक आहे. त्यादृष्टीने योग्य ती सर्व उपाययोजना करावी.

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

आपला,

(नि.ज.वागळे)
अवर सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र